# अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग

# पुणे महानगरपालिका

# सूचना पत्र

---

पुणे शहरातील सार्वजनिक **सण/उत्सव/समारंभ कालावधीत मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप** इत्यादी उभारणा-या **सर्व सार्वजनिक मंडळे, संस्था, संघटना व संबंधित नागरिकांना** मा. उच्च न्यायालयाने **जनहित याचिका क्र.१७३/२०१० चे मध्ये दिलेल्या आदेशानुसार** कार्यवाही करणेकरीता **खालीलप्रमाणे सूचना** देण्यात येत आहेत, त्याचे सर्वांनी **काटेकोरपणे** पालन करावे. तसेच यापूर्वी मनपाने मान्य केलेल्या **पुणे महानगरपालिका-मंडप धोरण २०१५** चे मधील नमूद सर्व अटी/शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.

---

१. सर्व संबंधितांनी सण/उत्सव/समारंभाकरीता उभारण्यात येणा-या मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप इत्यादी उभारणेकरीता **पोलीस विभाग/महानगरपालिकेच्या परवानगीसाठी उत्सवांपूर्वी** २० ते २५ **दिवस अगोदरच** स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये आवश्यक **कागदपत्रांसह अर्ज पुणे शहर पोलीस विभाग व महानगरपालिका यांचेमार्फत** चालू केलेल्या तेथील **एक खिडकी योजनेअंतर्गत** ऑफलाईन अथवा ऑनलाईन पद्धतीने www.punepolice.co.in/online-parwana या संकेतस्थळावर दाखल करावेत. त्या अंतर्गत मंडप परवाने देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

२. उत्सव सुरू होण्यापूर्वी **कमीत कमी ७ दिवस अगोदरच आवश्यक त्या सर्व परवानग्या** संबंधितांनी घेणे आवश्यक आहे. **परवान्यातील अटी/शर्तींनुसार** व नेमून दिलेल्या जागेवरच मान्य आकारातच मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप इत्यादी रचना उभारणे बंधनकारक राहील.

३. मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप इत्यादीची उभारणी करताना **त्या ठिकाणच्या दर्शनी भागात घेतलेल्या परवान्याची झेरॉक्स प्रत सुस्थितीमध्ये सर्वांना दिसेल** अशा ठिकाणी लावणे सर्वांना संबंधितांना बंधनकारक राहील.

४. वरील कोणतीही रचना उचित परवानगीशिवाय उभारल्यास अथवा घेतलेली परवानगी मंडप/कमानीच्या दर्शनी भागात लावल्याचे मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे नियंत्रणाखालील **मंडप तपासणी पथकास** दिसून न आल्यास त्यांचेकडील आलेल्या अहवालानुसार **असे मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप इ. रचना अनधिकृत समजून पोलीस विभाग व मनपा यांचेमार्फत निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात येईल**, कृपया याची नोंद घ्यावी.

५. **मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे नियंत्रणाखाली** गठीत करण्यात आलेल्या मंडप तपासणी पथकामार्फत **उत्सव सुरू होण्याच्या ७ दिवस अगोदर** किंवा त्या दरम्यानच्या कालावधीत **मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप इत्यादींची तपासणी** सुरू करेल. अशा मंडप तपासणीचा अहवाल **सक्षम प्राधिका-याकडे उत्सव सुरू होण्यापूर्वी ३ दिवस अगोदर** सादर करणार आहे.

६. पूर्व परवानगीने कोणतीही **मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप इ. उभारताना नागरिकांच्या व वाहनांच्या रहदारीस कोणताही अडथळा होणार नाही,** अशा रीतीने तेथील रस्त्याच्या रुंदीपैकी **कमीत कमी २/३ अथवा त्यापेक्षा जास्तीचा रस्ता मोकळा ठेवून, तसेच तेथील पादचाऱ्यांच्या रहदारीकरिता पदपथांच्या जागा** रिकाम्या ठेवूनच मंडप उभारावेत. स्थानिक नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेणे संबंधितांवर बंधनकारक राहील. कोणतीही **रचना उभारताना रस्ता, पदपथांवर खड्डे घेवू नयेत.**

७. **शहराच्या मध्यवस्ती भागामधील मोठ्या प्रमाणात नागरिकांची रहदारी व वर्दळ असणाऱ्या भागातील ८ मी. अथवा त्यापेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यांवर** उत्सव मंडपास परवानगी मिळणार नाही.

८. पुणे महानगरपालिका व पोलीस विभाग यांनी मंडप/कमान/स्टेज/रनिंग मंडप इ. रचना उभारणेकरीता दिलेल्या **परवाना पत्रामधील सर्व अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे** सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील. वाहतूक पोलीस विभागाने त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्रात नमूद केलेल्या मंडप साईजपेक्षा ज्यादा मापाचे जागेवर मंडप उभारणी केल्यास, असे मंडपावर नियमानुसार **निष्कासनाच्या** कारवाया करण्यात येतील.

९. जास्त रहदारी असणाऱ्या शहराच्या मध्य भागातील जुन्या पारंपारिक मंडळानी त्यांचे मंडप उभारताना मागील वर्षाच्या मान्य आकारमानानुसार उभारणेस मान्यता मिळाल्यास, उत्सव मंडपाचे परिसरातील वाहतूक व्यवस्था व पदपथांवरील नागरिकांच्या रहदारीस कोणतेही अडथळे निर्माण होणार नाही, यादृष्टीने स्वयंसेवकांच्या नेमणुका करणे आवश्यक राहील.

१०. मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार अनधिकृत मंडप/कमान/रनिंग मंडप व इतर देखावे तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत नागरिकांना तक्रारी करणेकरिता म.न.पा.च्या सर्व क्षेत्रिय कार्यालय स्तरावर तसेच सर्व स्थानिक पोलीस स्टेशन स्तरावर तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित केलेली आहे. या यंत्रणेमार्फत सण/उत्सवांचे कालावधीत येणाऱ्या तक्रारींचे संपूर्ण निराकरण करण्यात येणार आहे.

११. महानगरपालिकेच्या खालील इलेक्ट्रॉनिक माध्यमांमार्फत वरील तक्रार निवारण यंत्रणेकडे शहरातील नागरिकांना तक्रारी दाखल करता येतील.

- **मायक्रो-संकेतस्थळ :-** http://complaint.punecorporation.org
- **टोल फ्री नंबर** – 1800 103 0222 • **सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांचे दूरध्वनी क्रमांकावर**
- **मोबाईल ॲप** – PUNE Connect (PMC Care), Whatsapp NO- 9689900002
- **ई-मेल -** feedback@punecorporation.org, encroachment1@punecorporation.org
- Google+ : pmc fmc • Twitter: @pmcpune • Facebook: facebook/pmcfmc

१२. मनपाच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात वरीलकामी **स्वतंत्र नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक** करण्यात आली आहे. त्यांचेमार्फत उत्सवांचे कालावधीत नागरिकांकडून करण्यात येणाऱ्या विविध खात्यांकडील तक्रारींचेबाबत तसेच मंडप उभारणीबाबत माहिती देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर नोडल अधिकाऱ्यांचे नाव व संपर्क क्रमांक यादी सोबत जोडली आहे.

१३. **पुणे शहरातील ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रार निवारण यंत्रणा :-** पुणे महानगरपालिका क्षेत्रात सण उत्सव कालावधीत ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी व त्यांचे संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी सर्व नागरिकांना पुणे पोलीस आयुक्तालयामधील **www.punepolice.gov.in/circulars** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

यापूर्वी मनपाने मान्य केलेल्या **पुणे महानगरपालिका-मंडप धोरण २०१५ चे मधील नमूद सर्व अटी/शर्तीचे पालन करून तसेच वरील नव्याने या धोरणात समाविष्ट केलेल्या सर्व नियमांची पूर्तता करून** पुणे शहरातील यावर्षीचा गणेशोत्सव / नवरात्रोत्सव शांततेने पार पाडला जाईल, याबाबत सर्व गणेश मंडळांनी/ गणेशभक्तांनी दक्षता घेवून पुणे महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.

**दिनांक : २९/०८/२०१८**

| | |
|---|---|
| **(मुक्ता टिळक)** | **(सौरभ राव)** |
| **मा. महापौर,** | **महापालिका आयुक्त,** |
| **पुणे महानगरपालिका** | **पुणे महानगरपालिका** |

---